# बृहन्मुंबई महानगरपालिका
## **सार्वजनिक आरोग्य खाते**
**क्षयरोग रुग्णालय समूह, शिवडी-15.**
**काआअ/5901/क्षरुस(वआ) दि. 23.08.2024.**

## **जाहिरात**

सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत क्षयरोग रुग्णालय समूहाच्या आस्थापनेवरील खालील नमूद **वैद्यकीय अधिकारी,** MBBS(MO-IRCU) **4पदे व अतिदक्षतातज्ञ (**Intensivist**)** 4 पदे 02 वर्षाकरिता कंत्राटी तत्वावर प्रत्येकी 6 महिनेनंतर एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन उरोरोग अतिदक्षताविभागासाठीकंत्राटीवैद्यकीय अधिकारी,MBBS(MO-IRCU)यांनारु.90,000/-(नव्वद हजार फक्त) दरमहा, अतिदक्षतातज्ञ (Intensivist)डॉक्टर्स(MBBS+Post Graduation Diploma+one ICU experience) यांना रु.1,25,000/- (रुपये एक लाख पंचवीस हजार फक्त) दरमहा,अतिदक्षतातज्ञ (Intensivist)डॉक्टर्स(MBBS+Post Graduation Degree)यांना एक वर्षापेक्षा कमी अनुभव असल्यास रु.1,25,000/-(रुपये एक लाख पंचवीस हजार फक्त), 1 ते 5 वर्ष कामाचा अनुभव असल्यास रु.1,35,000/- (रुपये एक लाख पस्तीस हजार फक्त), 5 ते 8 वर्ष कामाचा अनुभव असल्यास 1,50,000/-(रुपये एक लाख पंन्नास हजार फक्त) तसेच 8 किंवा जास्त वर्ष कामाचा अनुभव असल्यासरु.2,00,000/-(रुपये दोन लाख फक्त) इतक्यादरमहा,वेतनावर भरण्याकरिता खालील नमूद अर्हता धारण केलेल्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

1) वैद्यकीय अधिकारी, उरोरोग अतिदक्षता विभागMBBS(MO-IRCU)– 4 पदे

शैक्षणिक **अर्हता-**

1. उमेदवाराकडे मान्यताप्राप्त विद्यापिठाची ''एम.बी.बी.एस.'' पदवीअसणे आवश्यक आहे.
2. उमेदवारास अतिदक्षता विभागात काम केल्याचा अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल.
3. अपवादात्मक स्थितीमध्ये अनुभव शिथील करण्यात येयील.

**2)**अतिदक्षतातज्ञ(INTENSIVIST)डॉक्टर्स:-4 पदे

शैक्षणिक **अर्हता-**

1. उमेदवाराकडे औषधवैद्यकशास्त्रातील तसेच छातीविकारशास्त्र, भुलरोगशास्त्र, अतिदक्षता विभाग या शास्त्रातील M.D./DNB पदवी (PG Degree) किंवा पदविका (PG Diploma) असावी.

2औषधवैद्यकशास्त्रातीलपदवी(MD/DNB Medicine) असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

3. पदव्युत्तर पदवीकाधारक (PG Diploma) उमेदवाराकडे अतिदक्षता विभागात किमान 12 महिने काम केल्याचा अनुभव असावा.
4. अपवादात्मक स्थितीमध्ये अनुभव शिथील करण्यात येतील.

सर्वसाधारणअटी–

1) उमेदवाराकडे महाराष्ट्र वैद्यकीय परिषद यांची मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी/पदवीका (PG Degree/PG Diploma)तसेच त्यांचे नोंदणीकरण किंवा नोंदणीकरणाचे नुतनीकरण असणे बंधनकारक आहे.
2) वैद्यकीय अधिकारी, MBBS (MO-IRCU) व अतिदक्षतातज्ञ (Intensivist) पदावरिल नियुक्ती भविष्यात कोणत्याही परिस्थितीमध्ये नियमित करण्यात येणार नाही.
3) वैद्यकीय अधिकारी, MBBS (MO-IRCU) व अतिदक्षतातज्ञ (Intensivist) कंत्राटी तत्वावरील पदधारकास दर 6 महिन्यानंतर एक दिवसाचा खंड देण्यात येईल.
4) वैद्यकीय अधिकारी, MBBS (MO-IRCU) व अतिदक्षतातज्ञ (Intensivist)कंत्राटी तत्वावरची नियुक्ती आवश्यकता नसल्यास कुठल्याही क्षणी संपुष्टात आणण्यात येईल.
5) वैद्यकीय अधिकारी, MBBS (MO-IRCU) व अतिदक्षतातज्ञ (Intensivist)कंत्राटी तत्वावरची नियुक्ती ही नियमित तत्वावरिल नियुक्तीकरिता ग्राहय धरण्यात येणार नाही.
6) वैद्यकीय अधिकारी, MBBS (MO-IRCU) व अतिदक्षतातज्ञ (Intensivist) नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी पदधारकाने चुकीची माहीती प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केल्याने किंवा कोणतीही माहीती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची नियुक्ती रद्दबादल करण्यात येईल.
7) नियुक्तीच्या वेळी 200 रुपयांच्या बॉन्ड पेपरावर विहित नमुन्यातील कंत्राट करार करुन संबंधीत आस्थापनेस 07 दिवसाच्या आत सादर करणे आवश्यक राहील अन्यथा त्याची नियुक्ती रद्दबादल करण्यात येईल.
8) उमेदवाराच्या कंत्राटी तत्वावरिल नेमणूकीनंतर त्रैमासिक अनुपालन अहवाल (performance report) जसे की दैनंदीन उपस्थिती, दिलेल्या सेवेचा संख्यात्मक व गुणात्मक अहवाल यानुसार क्रंत्राटी सेवा पुढे चालू ठेवण्यात येईल.
9) वैद्यकीय अधिकारी, MBBS (MO-IRCU) व अतिदक्षतातज्ञ (Intensivist) कंत्राटी तत्वावरिल पदधारकाने नियुक्ती कालावधीत शिस्तभंग केल्याचे निदर्शनास आल्यास त्याची नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.
10) कुठल्याही कारणास्तव पदधारकास पदाचा राजीनामा दयावयाचा असल्यास त्याने एक महिना आधी पुर्वसूचना देणे बंधनकारक आहे.
11) वैद्यकीय अधिकारी, MBBS (MO-IRCU) व अतिदक्षतातज्ञ (Intensivist)क्षयरोग रुग्णालय प्रमुखांच्या अधिपत्याखाली कर्तव्यार्थ राहतील.
12) वैद्यकीय अधिकारी, MBBS (MO-IRCU) व अतिदक्षतातज्ञ (Intensivist)उरोरोग विभागात चंक्रांकीत पदधतीने 24 x 7 कार्यरत राहतील.
13) वैद्यकीय अधिकारी, MBBS (MO-IRCU) व अतिदक्षतातज्ञ (Intensivist)यांना चक्रांकीत पद्धतीने साप्ताहीक रजा देण्यात येईल.

14) निर्धारित रजेव्यतिरिक्त कोणी डॉक्टर्स अपरिहार्य कारणाने अनुपस्थित असतील तसेच रजा राखीव (Leave Reserve)डॉक्टर्स सुद्धा कमी पडत असतील तर अनुपस्थित डॉक्टरांचे वेतन त्याप्रमाणामध्ये कापून घेण्यात येईल व त्यांच्या जागी काम करणा-या अन्य डॉक्टरांना त्या दिवसाची पूरक रजा (Compensatory off) देण्यात येथील तसेच सलग तीन रात्रपाळी केल्यानंतर एक पूरक रजा व त्याव्यतिरिक्त आळीपाळीने एक साप्ताहीक रजा (weekly off) देण्यात येईल.परंतुपुरकरजावसाप्ताहिकरजायाआपातकालीनपरिस्थीतीमध्येमंजुरकेल्याजाणारनाहीतअथवारद्दकेल्याजातील.

15) वैद्यकीय अधिकारी, MBBS (MO-IRCU) व अतिदक्षतातज्ञ (Intensivist)आपातकालीन काळात रुग्ण सेवा देण्यासाठी उपलब्ध राहणे बंधनकारक असेल.

16) पदधारक विहीत अटि पूर्ण करित नसल्याचे कोणत्याही क्षणी निदर्शनास आल्यास त्याची नियुक्ती त्वरित रद्द करण्यात येईल व याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

17) पदधारकाने या पदाचे आदेश प्राप्त झाल्यावर सात दिवसाच्या आत त्वरित कर्तव्यार्थ हजर राहावे लागेल अन्यथा सदर पदाच्या नियुक्तीकरिता आपणास स्वारस्य नसल्याचे समजून पुढिल उमेदवाराची नियुक्ती करण्यात येईल.

18) सदर निवड प्रक्रिया Walk in Inrerview पद्धतीने क्षयरोग रुग्णालय समूह या रुग्णालयाच्या प्रशासकीय कार्यालयात निवड समितीमार्फत करण्यात येयील.

19) सदर उमेदवाराचे अर्ज क्षयरोग रुग्णालय समुहांच्या आवक-जावक विभागात ऑफलाईन स्वीकारले जातील.

20) संसर्गजन्यवातावरण असल्याने सदर उमेदवारांचे वयोमर्यादा ही 50 पेक्षा जास्त नसावी

21) जो पर्यंत योग्य उमेदवार अवगत होत नाही तो पर्यंत सदर पदाची पाहिरात पुन्हा प्रसारित केली जाईल.

<u>कर्तव्यवजबाबदा-या</u>-

**वैद्यकीय अधिकारी (**MOIRCU) **यांची कर्तव्यसूची-**

1. चक्रांकित पद्धतीने दिवस व रात्र पाळीमध्ये अतिदक्षता विभाग (IRCU) सांभाळणे.
2. अतिदक्षता विभाग (IRCU) मधील रुग्णांची दैनंदिन तपासणी करणे, रक्ताचे नमुणे गोळा करणे, Intravenous canula, Foleys catheter, Ryles Tube टाकणे.
3. अतिदक्षता विभाग (IRCU) मधील वैद्यकीय अपात्कालीन कॉल्स जसे Haemoptysis Pneumothorax, Hydropeunmothorax, प्रतिकुल औषध प्रतिक्रिया (ADR), श्वसनास त्रास, बेशुद्ध होणे इत्यादी बघणे व उपचार करणे.
4. अतिदक्षता विभाग (IRCU) मध्ये Pleural, Ascitic tapping करणे.
5. अतिदक्षतातज्ञ (Intensivist) डॉक्टर्स सोबत IRCU विभागातील रुग्णांची तपासणी करणे.

6. अतिदक्षता विभागातील रुग्णांना Intubation करणे, Bi-PAP मशीन,NIV मास्क लावणे व सदर कामकाजासाठी अतिदक्षता तज्ञ यांची मदत व मार्गदर्शन घेणे.
7. सर्व रुग्णांची वेळोवेळी Monitoring करणे.
8. वैद्यकीय महाविद्यालयातून व इतर रुग्णालयांतून क्षयरोग रुग्णालयात रुग्णांना स्थलांतरीत करुन घेण्यासाठी समन्वय साधने व त्यांना आंतरुग्ण विभागात भरती करुन घेणे.
9. न्यायवैद्यकीय प्रकरणे हाताळणे व त्यासंदर्भात न्यायालयीन कामकाजाला हजर राहणे.
10. उपरोक्त कामकाजाची विभागणी जेष्ठतेनुसार व प्रशासकीय सोयीनुसार करणे.
11. उपरोक्त कामे वगळता गरज पडल्यास वरिष्ठांनी कामाच्या गरजेनुसार नेमून दिलेली कोणतेही. काम करणे बंधनकारक राहिल.

**अतिदक्षतातज्ञ (Intensivist) डॉक्टर यांची कर्तव्यसूची-**

1. चक्रांकित पद्धतीने दिवस रात्र पाळीमध्ये अतिदक्षता विभाग (IRCU) सांभाळणे.
2. वैद्यकीय अधिकारी (IRCU) यांना मार्गदर्शन करणे व त्यांच्या कामकाजावर लक्ष ठेवणे.
3. अतिदक्षता विभागात भरती होणा-या रुग्णांची Case History घेणे, दररोज तपासणी करणे व त्यांची Indoor Paper वर नोंद करणे.
4. वैद्यकीय अधिकारी (MO IRCU) यांच्याकडून अशक्य झालेली कार्यवाही पूर्ण करणे.
5. अतिदक्षता विभागातील रुग्णांना Intubation करणे, Bi-PAP मशीन, NIV मास्क लावणे.
6. सर्व रुग्णांची वेळोवेळी Monitoring करणे.
7. गरज भासल्यास बाह्यरुग्ण/आंतररुग्ण विभागात जाऊन तपासणी करणे व आवश्यकता भासल्यास अशा रुग्णांना अतिदक्षता विभाग (IRCU) मध्ये भरती करुन घेणे.
8. IRCU मधील रुग्णांच्या तब्येतीचा गोषवारा विशेषज्ञ वैद्यकीय सल्लागार (SMC)अतिदक्षता विभाग (IRCU) यांना देणे व त्यांच्यासोबत आंतरुग्ण कक्षामध्ये भेट देणे.
9. न्यायवैद्यकीय प्रकरणे हाताळणे व त्यासंदर्भात न्यायालयीन कामकाजाला हजर राहणे.
10. उपरोक्त कामकजाची विभागणी जेष्ठतेनुसार व प्रशासकीय सोयीनुसार करणे.

**अतिदक्षतातज्ञ (Intensivist)** या 4 पदांवरिल 3 पदांची नियुक्ती आधी करण्यात येईल व उरोरोग विभाग पुर्णक्षमतेने कार्यरत झाल्यानंतर प्रतिक्षा यादितून उर्वरितअतिदक्षता तज्ञाची नियुक्ती करण्यात येईल.

वैद्यकीय अधिक्षक क्षयरोग रुग्णालय यांचे कार्यालयात जाहिरात प्रसारित झाल्यापासून दि**.28.08.2024 ते दि.10.09.2024** पर्यत आलेले अर्ज प्रचलित निवड प्रक्रियेनुसार निवडण्यात येतील. सदर जाहिरात व भरतीप्रक्रीया ही 1 वर्षासाठीग्राह्यराहील.

Sd/-
वैद्यकीय अधिक्षक
क्षयरोग रुग्णालय समुह